# 25 जानेवारी

**आजचा सुविचार :**

“नेहमी खरे बोलावे.”

**आजचे पंचांग :**

वार – मंगळवार मास - पौष नक्षत्र – चित्रा

सूर्योदय – सकाळी 7.03 वाजता सूर्यास्त – सायंकाळी 06.26 वाजता

**आजचे दिनविशेष :**

1) भारतीय पर्यटन दिन

2) जागतिक कुष्टरोग निवारण दिन

3) 1983 : भारतीय स्वातंत्र्यवीर आणि भूदान चळवळीचे प्रणेते विनोब भावे यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित.

**आजचे इंग्लिश शब्द : ( Animals / प्राणी ) :**

1) Bear – अस्वल 2) Leopard - बिबट्या 3) Wolf – लांडगा 4) Bison - गवा

**आजची प्रश्नमंजुषा :**

1) आपल्या तालुक्याचे नाव काय आहे? 2) मुख्य आणि उपदिशा सांगा.

3) 75 - 35 = किती? 4) वाळवंटात राहणाऱ्या प्राण्यांची नावे सांगा.

5) भारत देशात किती राज्ये आहेत?

**आजची बोधकथा :**

## गर्विष्ठ मोर

एक मोर होता. तो फार बढाईखोर होता. स्वत:च्या रूपाचा त्याला फार गर्व होता. तो दररोज नदीकिनारी जायचा. पाण्यात स्वत:चे प्रतिबिंब पाहून, स्वताच्या सौंदर्याची स्तुती करायचा.

मोर म्हणायचा, “ माझा डोलदार पिसारा पहा! त्या पिसाऱ्यावरील मोहक रंग पहा!! माझ्याकडे पहा! जगातील सर्वात सुंदर पक्षी मीच आहे.”

एकेदिवशी मोराला नदीकिनाऱ्यावर एक करकोचा दिसला. मोराने त्याचाकडे पाहून आपले तोंड फिरवले. आणि तुच्छतेने करकोच्याला म्हणाला, “ किती रंगहीन आहेस तू! तुझे पंख पांढरे फटक आणि निस्तेज आहेत.”

करकोचा म्हणाला, “ मित्रा, तुझा पिसारा नक्कीच सुंदर आहे. माझे पंख तुझ्यासारखी सुंदर नाहीत. पण म्हणून काय झालं? तुझ्या पंखांनी तू उंच उडू शकत नाहीस. मी मात्र माझ्या पंखांनी उंच उडू शकतो. “एवढे बोलून करकोचा ने आकाशात झेप घेतली. मोर मात्र खजील होऊन त्याच्याकडे पाहत राहिला.

**तात्पर्य** --- दिखाऊ सौंदर्यापेक्षा उपयुक्तता महत्वाची असते.

## प्रतिज्ञा:

भारत माझा देश आहे.
सारे भारतीय माझे बांधव आहेत.
माझ्या देशावर माझे प्रेम आहे.
माझ्या देशातल्या समृद्ध आणि
विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे.
त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता
माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करेन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा
आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन
आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.
माझा देश आणि माझे देशबांधव
यांच्याशी निष्ठा राखण्याची
मी प्रतिज्ञा करीत आहे.
त्यांचे कल्याण आणि
त्यांची समृद्धी ह्यांतच माझे
सौख्य सामावले आहे.

जय हिंद

## English Pledge: ( इंग्लिश प्रतिज्ञा )

India is my country.

All Indians are my brothers and sisters.

I love my country and, I am proud of it's rich and varied heritage.

I shall always strive to be worthy of it.

I shall give my parents, teachers and all elders respect and treat everyone with courtesy .

To my country and my people, I pledge my devotion.

In their well being and prosperity alone, lies my happiness.

Jai Hind !